# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
# कृषि नगर, अकोला ४४४ ००१

विषय:- विद्यापीठातील प्रस्ताव व पत्र व नस्ती महाराष्ट्र शासन मुबंई व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांचे कार्यालयास विहीत मार्गाने सादर करणेबाबत.

## परिपत्रक:-

जा.क्र साप्रवि /परिपत्रक/इप्रा पत्रव्यव्हार/२०२६ /२७०६ — दि ३१/०७/२०२६

विद्यापीठातील विविध विभागांकडून शासनस्तरावरील तसेच महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडे सादर करण्यात येणारे प्रस्ताव, पत्रव्यवहार व नस्ती थेट पाठविण्यात येत आहेत त्यामुळे प्रशासकीय समन्वयाचा अभाव दिसुन आल्याचे निदर्शनास आले आहे.

यामुळे शासकीय कामकाजात विलंब होणे, नस्ती हरविणे तसेच प्रशासकीय समन्वयाचा अभाव दिसून येतो. तरी सर्व संबंधित विभाग प्रमुख, नियंत्रण अधिकारी, अधिष्ठाता, व कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून महाराष्ट्र शासन, मुंबई व कृषि परिषद पुणे यांचेकडे सादर करावयाचे सर्व प्रस्ताव, पत्रे व नस्ती हे विहीत मार्गाने सादर करण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत संबंधित विभागाने थेट शासन किंवा परिषद कार्यालयास पत्रव्यवहार करू नये. विहीत मार्गाचे उल्लंघन करून थेट पाठविलेल्या नस्ती/प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. याबाबत कसूर आढळून आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदर परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करावी. सर्वांनी सहकार्य करुन प्रशासकीय समन्वय किंवा कुठलीही तांत्रिक अडचण निर्माण होणार नाही याची संबधितांनी नोंद घेण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांचे मंजुरीने निर्गमित करण्यात येत आहे.

स्वा/
प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी माहीती व उचित कार्यावहीकरीता.

१. संचालक शिक्षण /संशोधन/विस्तार शिक्षण डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
२. अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी / उद्यानविद्या डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता, (सर्व)------------------------------------------------------------
४. विभाग प्रमुख (सर्व)------------------------------------------ डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला.
५. नियंत्रक,/विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल . पं.दे.कृ. वि., अकोला.
६. मा. कुलगुरुंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहीतीकरीता.
७. उपकुलसचिव आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग / वि.वि. डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला

प्रिती रोडगे,
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Order-M (I)